"ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) आदेश, २०२१" - दि. २४/११/२०२१ मध्ये अंशत: सुधारणा क्र.२

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/ग्रापनि-२०२१/प्र.क्र.४/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २७/०१/२०२२

**विषय : ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) आदेश २०२१ - दिनांक २४/११/२०२१ मध्ये अंशत: सुधारणा क्र. २**

संदर्भ : १) मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका १४७६०/२०२० मध्ये दिलेले निदेश
२)मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका ८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका१९७५६/२०२१ व रिट याचिका क्र. १३१६/२०२१ मधील दिनांक १५/१२/२०२१रोजीचा निर्णय.
३) राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०४/का.८,दि.२४/११/२०२१च्या आदेशान्वये दिलेले सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण आदेश
१) आयोगाचे समक्रमांकाचे ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) आदेश २०२१- दिनांक २४/११/२०२१ मध्ये अंशत: सुधारणा क्र. १, दिनांक २९/१२/२०२१ चे आदेश

## आ दे श

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदींनुसार ग्रामपंचायतींच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने समक्रमांकाच्या दि.२४ नोव्हेंबर, २०२१ अन्वये सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण निश्चित करण्यासंदर्भात सविस्तर आदेश निर्गमित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.१९ जानेवारी, २०२२ रोजी झालेल्या आदेशानुसार राज्याने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाबाबत असलेली आकडेवारी संबंधित मागासवर्ग आयोगास द्यावी. आयोगाने सदर

आकडेवारी तपासून त्यानुसार योग्य त्या शिफारसी राज्यास तसेच राज्य निवडणूक आयोगास कराव्यात, असे आदेशित केले आहे.

आणि ज्याअर्थी, सदर शिफारसी प्राप्त होण्यास अथवा त्यानुसार योग्य तो निर्णय होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता असून निवडणुकांचे कामकाज विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने निवडणूक प्रभागांच्या हद्दी निश्चित करण्याचा टप्पा तत्पूर्वी पूर्ण करून घेणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, आरक्षण सोडतीची प्रक्रिया पूर्ण करण्यापूर्वी निवडणूक प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करून त्यावरील हरकती व सूचना तसेच सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने दि.२४ नोव्हेंबर, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या आदेशात योग्य ते बदल करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० (अ)४ नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून त्याअंतर्गत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्य संख्या ठरविणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता दि. २४ नोव्हेंबर, २०२१ रोजी निर्गमित केलेल्या आदेशात सोडत, प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दी, सुनावणी व प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना इत्यादींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारणा करीत असल्याचे आदेश देत आहे :-

१) दिनांक २४/११/२०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. १०.४ नुसार जिल्हाधिकारी यांनी प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता दिल्यानंतर, आरक्षित प्रभागांची सोडत काढण्यापूर्वी, प्रथम निवडणूक प्रभागांच्या सीमा दर्शविणारे प्रारूप सोबतच्या - परिशिष्ट १- नमुना ब नुसार प्रसिध्द करून त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी. तसेच मुद्दा क्र.११.८.२ प्रभाग रचनेचे नकाशे देखील प्रसिध्द करण्यात यावेत.

२) निवडणूक प्रभागांच्या सीमा दर्शविणाऱ्या प्रारूप अधिसुचनेवर विहीत कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात याव्यात.

३) प्राप्त हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात.

४) प्राप्त हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी देण्यात यावी.

५) सुनावणीनंतर उपविभागीय अधिकारी यांनी अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करावेत.

६) दिनांक २४/११/२०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. १३ नुसार उपविभागीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभागाच्या सीमा दर्शविणाऱ्या सोबतच्या परिशिष्ट २ - नमुना अ नुसार अंतिम अधिसूचनेस मान्यता देऊन स्वाक्षरी करावी. प्रभाग रचनेचे नकाशे देखील प्रसिध्द करण्यात यावेत.

७) त्यानंतर सदर प्रभागांची सीमा दर्शविणारी अंतिम अधिसूचना प्रसिध्द करुन त्यास योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.

८) वरीलप्रमाणे निवडणूक प्रभागांच्या सीमा अंतिमतः अधिसूचित केल्यानंतर सदर प्रभागात आरक्षण निश्चित करण्याबाबतचे आदेश राज्य निवडणूक आयोगामार्फत स्वतंत्ररित्या देण्यात येतील.

९) सोडतीनंतर राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येणाऱ्या स्वतंत्र कार्यक्रमानुसार प्रभागनिहाय आरक्षण दर्शविणारी अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी.

१०) वरील प्रमाणे प्रभागांच्या सीमा अधिसूचित करण्याकरीता प्रारुप व अंतिम अधिसूचनांचे नमुने परिशिष्ट १ व २ सोबत जोडल्यानुसार सुधारीत करण्यात येत आहेत.

( यु. पी. एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी,

५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. सर्व उप जिल्हाधिकारी (ग्रामपंचायत निवडणूक) (जिल्हा मुख्यालय)
७. सर्व उपविभागीय अधिकारी
८. सर्व तहसीलदार
९. सर्व गट विकास अधिकारी
१०.सर्व मंडळ अधिकारी
११.सर्व ग्राम सेवक
१२.सर्व तलाठी
१३.आयोगातील सर्व कार्यासने
१४.निवड नस्ती.

## परिशिष्ट १

**(परिच्छेद क्र. ११.८.१)**

## प्रारूप प्रभाग रचनेची नोटिस व माहितीचा तक्ता

**(नियम ५ (२) पहा)**

# नोटीस

मी, ---------------------, राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) नियम, १९६६ याच्या नियम ५(२) अनुसार अधिसूचनेचा पुढील मसुदा गावातील सर्व नागरिकांच्या माहीतीसाठी याद्वारे प्रसिध्द करीत आहे व याद्वारे अशी नोटीस देत आहे की, उक्त अधिसूचनेच्या मसुद्याच्या संबंधात गावातील कोणत्याही व्यक्तीने आक्षेप किंवा सूचना दि.---------- पूर्वी दाखल केल्यास,त्या आक्षेप व सूचनांचा विचार केला जाईल.

## अधिसूचना

क्रमांक ----------

मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) १९६६ याच्या नियम ५(१) अनुसार मी ---------- राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,

(अ) ----------(नाव) ग्रामपंचायतीत ---------------- (संख्या) सदस्यांचा समावेश राहील;

(ब) सदर ग्रामंपचायतीचे ----------(संख्या) प्रभागांमध्ये विभाजन करण्यात येईल;

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या नमुना **'ब'** मध्ये निवडून द्यावयाची सदस्यांची संख्या ही स्तंभ ६मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील;

# अनुसूची
## नमुना ‘ब’

<table>
<tr><td colspan="6">ग्रामपंचायत –      तालुका–      जिल्हा –</td></tr>
<tr><td colspan="6">लोकसंख्येनुसार निवडून द्यावयाच्या सदस्यांची एकूण संख्या – ----</td></tr>
<tr><td rowspan="2">प्रभाग क्रमांक</td><td colspan="3">प्रभागाची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार)</td><td rowspan="2">प्रभागाची व्याप्ती/ विस्तार</td><td rowspan="2">प्रभागनिहाय सदस्य संख्या</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>अ.जा</td><td>अ.ज.</td></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>

दिनांक      जिल्हाधिकारी

## परिशिष्ट २

(परिच्छेद क्र. १३.१)

## नमूना 'अ' (अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना व माहितीचा तक्ता)

**(नियम ५ (१) पहा)**

# अधिसूचना

क्रमांक --------------------

मुंबई ग्रामपंचायत (सदस्यांची संख्या, प्रभागात विभाजन करणे व जागा राखून ठेवणे) १९६६ याच्या नियम ५ (१) अनुसार मी ------------ राज्य निवडणूक आयुक्तांकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी याद्वारे असे अधिसूचित करतो की,

(अ)----------(नाव) ग्रामपंचायतीत ----------------(संख्या) सदस्यांचा समावेश राहील;

(ब) सदर ग्रामपंचायतीचे ---------- (संख्या) प्रभागांमध्ये विभाजन करण्यात आले आहे.

(क) यासोबत असलेल्या अनुसूचीच्या नमुना **'अ'** मध्ये निवडून द्यावयाची सदस्यांची संख्या ही स्तंभ

६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांच्या संख्येइतकी राहील;

## नमुना 'अ'

## अनुसूची

| ग्रामपंचायत - | | | तालुका- | | जिल्हा - |
|---|---|---|---|---|---|
| लोकसंख्येनुसार निवडून द्यावयाच्या सदस्यांची एकूण संख्या - ---- | | | | | |
| प्रभाग क्रमांक | प्रभागाची लोकसंख्या (लगतच्या जनगणनेनुसार) | | | प्रभागाची व्याप्ती/ विस्तार | प्रभागनिहाय सदस्य संख्या |
| | एकूण | अ.जा | अ.ज. | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**दिनांक:** **जिल्हाधिकारी**